<u>प्रसिध्दीपत्रक</u>

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण) च्या ग्राहकांसाठी १ जानेवारी, २०१३ पासून रात्रीच्या वीज वापरासाठी देण्यात येणाऱ्या रिबेटमध्ये वाढ**

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने (आयोग) सन २०१२ च्या प्रकरण क्र. १९ मध्ये दि. १६ ऑगस्ट, २०१२ रोजी दिलेल्या निर्णय, निर्देश आणि आदेश यांच्या पुनर्विलोकनासाठी महावितरण कंपनीने पुनर्विलोकन याचिका (सन २०१२ चे प्रकरण क्र. १०७) दाखल केली होती. आयोगाने याचिकाकर्ता, ग्राहक प्रतिनिधी आणि इंटरव्हेनर यांनी उपस्थित केलेली सर्व निवेदने आणि मुद्दे विचारात घेऊन सन २०१२ च्या प्रकरण क्र. १०७ मध्ये २६ डिसेंबर, २०१२ रोजी आदेश पारित केला आहे.

महावितरण कंपनीने दाखल केलेल्या पुनर्विलोकन याचिकेत रात्रीच्या विजेची मागणी कमी असण्याच्या कालावधीत टीओडी रिबेटमध्ये वाढ करणे हा एक मुद्दा होता. या प्रकरणी कामकाज चालू असताना ग्राहक प्रतिनिधी आणि इंटरव्हेनर यांनी रात्रीच्या वेळी विजेची मागणी कमी असण्याच्या कालावधीत टीओडी रिबेटमध्ये वाढ करण्यास पाठींबा दर्शविला होता.

आयोगाने महावितरणच्या १६ ऑगस्ट, २०१२ रोजी मान्यता दिलेल्या वीज दराच्या आदेशामध्ये, विजेची मागणी कमी असण्याच्या कालावधीतील (म्हणजेच रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत) विजेच्या वापरासाठी टीओडी रिबेटमध्ये, प्रायोगिक तत्वावर १ जानेवारी २०१३ पासून ३ महिन्यांकरिता, १०० पैसे/युनिट ऐवजी २५० पैसे/युनिट टीओडी रिबेट देण्यास मान्यता दिली आहे. १ जानेवारी, २०१३ रोजीपासून हा सुधारित रिबेट लागू करण्यात येईल आणि ३१ मार्च, २०१३ पर्यंत तो अंमलात राहील. त्यानुसार, १ जानेवारी, २०१३ पासून अंमलात येणारे टीओडी दर खालीलप्रमाणे असतील :

| **वीज आकाराव्यतिरिक्त संबंधित वीज दर वर्गवारीला लागू असणारे टीओडी वीज दर (पैसे/युनिट)** | | |
|---|---|---|
| **टीओडी वेळेचा टप्पा** | **विद्यमान** | **सुधारीत १ जानेवारी , २०१३ पासून अंमलात येणारे दर** |
| रात्री १० ते सकाळी ६ | -१०० | -२५० |
| सकाळी ६ ते सकाळी ९ आणि दुपारी १२ ते सायंकाळी ६ | ० | ० |
| सकाळी ९ ते दुपारी १२ | +८० | +८० |
| सायंकाळी ६ ते रात्री १० | +११० | +११० |

तीन महिन्यांत येणाऱ्या अनुभवांच्या आधारावर, टीओडी रिबेटमधील सुधारीत दराच्या कालमर्यादेत वाढ मिळविण्यासाठी, विजेची मागणी कमी असण्याच्या कालावधीच्या दरम्यान सुधारीत टीओडी रिबेटच्या अंमलबजावणीच्या खर्च-लाभ विश्लेषणासह, आयोगाकडे सादर करण्याचे निर्देश महावितरण कंपनीला देण्यात आले आहेत.